ePaper

# ब्राझीलमध्ये 62 प्रवाशांना घेऊन जाणारं विमान कोसळलं!



वर्ष - 8 । अंक - 36 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- सेहरावतने जिंकलं पहिलं पदक
- नदीमला ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक
- महाविद्यालयाच्या हिजाब बंदीला स्थगिती
- सिसोदियांना न्यायालयाचा दिलासा


www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 10 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## 15 जागांची महापालिकेकडे मागणी

# मेट्रोचा महापालिकेच्या जागांवर डोळा!

### स्थानकांच्या उभारणीसाठी दोन्ही बाजूंच्या सेवा रस्त्यावरील पदपथाची जागा मेट्रोला हवी

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

**शहरातील अतिशय मोक्याच्या दहा ठिकाणच्या जागा यापूर्वी घेतल्यानंतर आता महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पिंपरी ते निगडी विस्तारित मार्गासाठी आणखी १५ जागांची महापालिकेकडे मागणी केली आहे. त्यातील बहुतांश जागा कायमस्वरूपी देण्याबाबत महामेट्रोने आग्रह धरला आहे.**



दापोडी ते पिंपरी मार्गावरील मेट्रोची मार्गिका पूर्ण होऊन वाहतूक सुरू झाली आहे. यासाठी महापालिकेने शहरातील अतिशय मोक्याच्या दहा ठिकाणच्या जागा पुणे मेट्रोसाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने हस्तांतरित केल्या आहेत. मात्र, महामेट्रोची स्थिरता, तिकिटेतर उत्पन्न वाढविण्यासाठी या जागांचा वाणिज्यिक वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने या जागा मेट्रोला मालकी हक्काने आणि बिनशर्त द्याव्यात, अशा सूचना राज्य सरकारने आयुक्तांना दिल्या आहेत. याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

पिंपरी ते निगडी या मार्गावरील मेट्रो मार्गिका, स्थानके, प्रवेशद्वार, जिना आणि उद्वाहन (लिफ्ट), वाहनतळासाठी महामेट्रोने महापालिकेकडे १५ जागांची मागणी केली आहे. या जागांमध्ये निगडी बस टर्मिनल येथील सहा जागा आहेत. त्यांचे क्षेत्रफळ ३ हजार ५६२.२९३ चौरस मीटर आहे. निगडी येथील रिकामी व पदपथाची जागा अशा दोन जागा त्यांना हव्या आहेत. त्याचे क्षेत्रफळ ६१६.४५ चौरस मीटर आहे. आकुर्डी येथील मौलाना अबुल कलाम आझाद विद्यालयाच्या एकूण २८५.३३ चौरस मीटर अशा दोन जागा, आकुर्डी येथील पदपथाच्या पाच वेगवेगळ्या जागा (क्षेत्रफळ ४१९.१६) मेट्रोला हव्या आहेत, अशी ४८८४ चौरस मीटर जागा महामेट्रोने मागितली आहे. त्यातील बहुतांश जागा या कायमस्वरूपी देण्याची मागणी केली आहे.

### मेट्रोची चार स्थानके

**पिंपरी ते निगडी मार्गावर मेट्रोची चार स्थानके असणार आहेत. चिंचवड स्टेशन, आकुर्डीतील खंडोबा माळ चौक, निगडीतील टिळक चौक आणि भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पीएमपीएमएल आगारात शेवटचे स्थानक असणार आहे. स्थानकांच्या उभारणीसाठी त्या ठिकाणच्या दोन्ही बाजूंच्या सेवा रस्त्यावरील पदपथाची जागा मेट्रोला हवी आहे. महामेट्रोने पिंपरी ते निगडी मार्गावरील विविध १५ जागांची मागणी केली आहे. भाडेतत्त्वावर जागा देण्यात येणार आहेत. त्या संदर्भातील मूल्यांकन करून दर ठरविण्यासाठी नगररचना विभागास पत्र दिले आहे. त्यांच्याकडून उत्तर मिळाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले. स्थानके, प्रवेशद्वार, जिन्यासाठी जागा लागणार आहे. त्यासाठी १५ जागांची महापालिकेकडे मागणी केली असल्याचे महामेट्रोचे संचालक हेमंत सोनवणे यांनी सांगितले.**

## पिंपरी-चिंचवडमध्ये डेंग्यूचा डंख वाढला

### पिंपरी-चिंचवड शहरात जूनपासून डेंग्यूबाधित रुग्णांच्या संख्येत वाढ

**। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



शहरात डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत असून आतापर्यंत ५७ जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. तर, चिकनगुनिया आजाराचे सात रुग्ण आहेत. झिकाचे दोन्ही रुग्ण बरे झाले असून त्यांना घरी सोडण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहरात जूनपासून डेंग्यूबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. दोन महिन्यांमध्ये शहरात ५७ जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. वाढत्या डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने डेंग्यूमुक्त मोहीम सुरू करण्यात आली. समाजमाध्यमे, शहरातील मॉल, सिनेमागृहाद्वारे डेंग्यू, चिकनगुनिया आणि झिका या आजारांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. आठवड्यातून एक दिवस घर आणि परिसराची साफसफाई करण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, त्याचा प्रभाव दिसून येत नसून दिवसें-दिवस डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे.

झिका रुग्ण आढळलेल्या पिंपळेगुरव आणि निगडी परिसरात वैद्यकीय विभागाच्या वतीने सर्वेक्षण करण्यात येत आहे. आतापर्यंत १३ हजार ५४४ घरांची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये २६ संशयितांचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. २३ गर्भवती महिलांचेही नमुने घेतले आहेत. त्यांपैकी काहींचे तपासणी पूर्ण झाली असून त्यांचा अहवाल नकारात्मक आले आहेत.

### भांड्यात पाणी साचू देऊ नये

रुग्णांची प्रकृती गंभीर होत नाही. अनेक रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. घरातील भांड्यात पाणी साचू देऊ नये, आठवड्यातून एकदा साफसफाई करावी. लक्षणे दिसल्यास तातडीने जवळच्या रुग्णालयामध्ये तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले.

### 24 लाखांचा दंड वसूल

कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व्यावसायिक आस्थापना, गृहनिर्माण सोसायट्यांसह घरांची तपासणी करण्यात येत आहे. डासोत्पत्ती ठिकाणे आढळल्यामुळे दंडात्मक कारवाई केली जात आहे. एक जूनपासून २४ लाखांपेक्षा अधिक दंड वसूल केल्याचे आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी सांगितले. शहरात डेंग्यू, चिकनगुनियाचे रुग्ण आहेत.

# लाडक्या खुर्चीसाठी बहिणीची आठवण!

## शिवस्वराज्य यात्रा बघून विरोधकांना झोप लागणार नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवस्वराज्य यात्रेचा उदंड प्रतिसाद बघून विरोधकांना झोप लागणार नाही. असा टोला खासदार अमोल कोल्हे यांनी महायुतीला लगावला आहे. लाडक्या खुर्चीसाठी महाराष्ट्रातील लाडक्या बहिणीची आठवण होत, असल्याचा टोला देखील त्यांनी लगावला आहे. शिवस्वराज्य यात्रा भोसरी मध्ये दाखल झाल्यानंतर भव्य अशी सभा घेण्यात आली.**



कोल्हे यांनी चौफेर फटकेबाजी करत, पिंपरी- चिंचवडच्या स्थानिक राजकीय नेत्यांवर टोलेबाजी केली. अमोल कोल्हे म्हणाले, शिवस्वराज्य यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. लोकसभेच्या वेळी जे वातावरण होत, त्यापेक्षा अधिक पटीने यात वाढ झाली. खोके सरकारच्या विरोधात लोकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. महाराष्ट्रातील भ्रष्ट महायुतीच्या सरकारला चले जाओ म्हणण्याची वेळ आली आहे. पिंपरी- चिंचवड शहरात देखील कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला. स्मार्ट सिटी, अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पालकमंत्री अजित पवार हे भ्रष्ट कारभाराची चौकशी कधी लावणार? असा सवाल देखील त्यांनी केला आहे. लाडकी बहीण ही योजना केवळ लाडक्या खुर्चीसाठी आहे. लोकसभेत महायुती सरकारच्या कानाखाली जाळ काढल्याने अशा प्रकारच्या योजना हे सरकार आणत आहे. सर्व सामान्य नागरिकांचा पैसा या योजनेतून पुन्हा परत करत आहे. खासदार अमोल कोल्हे यांनी चौफेर फटकेबाजी करत पिंपरी- चिंचवड मधील स्थानिक नेत्यांवर टोलेबाजी केली. मोशीत कचऱ्याचे नव्हे सोन्याचे ढीग कोणाचे आहेत?. या कचऱ्यातून कुणाचं उकळ पांढर होत आहे?. असा प्रश्न उपस्थित करत लंडनमध्ये २०० कोटींच हॉटेल कुठल्यातरी कर्तुत्वान व्यक्तीच असल्याचं म्हणत या प्रकरणाचा पत्रकारांनी शोध पत्रकारितेच्या माध्यमातून शोध लावावा असं सूचक विधान कोल्हे यांनी केलं आहे. अजित पवार गटाचे माजी आमदार विलास लांडे यांची संदिग्ध भूमिका पुन्हा एकदा समोर आली आहे. भोसरीमध्ये पार पडलेल्या शिवस्वराज्य यात्रेच्या व्यासपीठावर विलास लांडे यांच्या पत्नी उपस्थित होत्या. त्याचबरोबर विलास लांडे यांचा फोटो देखील डिजिटल स्क्रिनवर झळकल्याच पाहायला मिळालं. जुन्नरमधून शरद पवार गटाच्या शिवस्वराज्य यात्रेला सुरुवात झाली. टप्प्याटप्प्याने भोसरीमध्ये रात्री शिवस्वराज्य यात्रा दाखल झाली. दरम्यान, आज सकाळपासूनच शहरातील भोसरीमध्ये या शिवस्वराज्य यात्रेची जय्यत तयारी सुरू होती. अजित पवार गटाचे आमदार विलास लांडे यांनी मंडपात येऊन आढावा घेतल्याने एकच चर्चा रंगली होती. संध्याकाळी झालेल्या शिवस्वराज्य यात्रेच्या मेळाव्यात विलास लांडे यांच्या पत्नी देखील उपस्थित होत्या. तसेच शरद पवार गटाच्या व्यासपीठाच्या मागे असलेल्या डिजिटल स्क्रिनवर देखील विलास लांडे यांचा फोटो असल्याने चर्चेला उधाण आल आहे. गव्हाणे हे महाविकास आघाडीकडून भोसरी विधानसभेसाठी इच्छुक आहेत. यावरून जयंत पाटील यांनी एक टिपण्णी केली. अजित गव्हाणे तुमच्याकडे कोण बघणार? कुणी अस म्हणत असेल तर हा जयंत पाटील तुमच्या सोबत आहे. तुम्ही काही काळजी करू नका. तुमची नेहमी भेट घेत राहील. शिवस्वराज्य यात्रेचा उदंड प्रतिसाद बघून विरोधकांना झोप लागणार नाही. असा टोला खासदार अमोल कोल्हे यांनी महायुतीला लगावला आहे. लाडक्या खुर्चीसाठी महाराष्ट्रातील लाडक्या बहिणीची आठवण होत, असल्याचा टोला देखील त्यांनी लगावला आहे.

### शिवस्वराज्य यात्रेची जय्यत तयारी

शिवस्वराज्य यात्रा भोसरी मध्ये दाखल झाल्यानंतर भव्य अशी सभा घेण्यात आली. अजित पवार गटाचे आमदार विलास लांडे यांनी मंडपात येऊन आढावा घेतल्याने एकच चर्चा रंगली होती. संध्याकाळी झालेल्या शिवस्वराज्य यात्रेच्या मेळाव्यात विलास लांडे यांच्या पत्नी देखील उपस्थित होत्या. जुन्नरमधून शरद पवार गटाच्या शिवस्वराज्य यात्रेला सुरुवात झाली. टप्प्याटप्प्याने भोसरीमध्ये रात्री शिवस्वराज्य यात्रा दाखल झाली. दरम्यान, आज सकाळपासूनच शहरातील भोसरीमध्ये या शिवस्वराज्य यात्रेची जय्यत तयारी सुरू होती.

# मिळकतकराचा धनादेश न वटलेल्यांवर कारवाई

## कलम 138 अन्वये ही कारवाई करण्यात येणार आहे

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चालू आर्थिक वर्षातील मिळकतकराच्या देयकापोटी धनादेश दिलेल्या, मात्र तो न वटलेल्या मिळकतधारकांवर शनिवारपासून कारवाई करण्याचा निर्णय महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने घेतला**



कलम १३८ अन्वये ही कारवाई करण्यात येणार आहे. मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख आर्थिक स्रोत आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मिळकतकर काही मिळकतधारकांनी धनादेशाद्वारे भरला होता. एक एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीत न वटलेल्या धनादेशांची संख्या एकूण १ हजार ९६८ एवढी असून ८ कोटी ३३ लाख, ९३ हजार ८४३ एवढ्या रकमेची मागणी आहेहजार २९२ धनादेशाची एकूण ४ कोटी ५७ लाख ३५ हजार ३१७ एवढी रक्कम वसूल केली आहे. उर्वरीत १४७ मिळकतधारकांना कलम १३८ अन्वये नोटीस बजाविण्यात आली आहे. त्यांच्यावर न्यायालयात दावा दाखल करण्याची प्रक्रियाही प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती कर आकारणी आणि कर संकलन विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी दिली. चालू आर्थिक वर्षातील मिळकतकराच्यामात्र तो न वटलेल्या मिळकतधारकांवर शनिवारपासून कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

### कलम 138 अन्वये नोटीस

कलम १३८ अन्वये ही कारवाई करण्यात येणार आहे. मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख आर्थिक स्रोत आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मिळकतकर काही मिळकतधारकांनी धनादेशाद्वारे भरला होता. एक एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीत न वटलेल्या धनादेशांची संख्या एकूण १ हजार ९६८ एवढी असून ८ कोटी ३३ लाख, ९३ हजार ८४३ एवढ्या रकमेची मागणी आहे. त्यापैकी कर आकारणी आणि कर संकलन विभागाने त्यापैकी १ हजार २९२ धनादेशाची एकूण ४ कोटी ५७ लाख ३५ हजार ३१७ एवढी रक्कम वसूल केली आहे. उर्वरीत १४७ मिळकतधारकांना कलम १३८ अन्वये नोटीस बजाविण्यात आली आहे.

# माजी आमदार विलास लांडे हेच पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील 'अनभिषिक्त सम्राट'!

## महाविकास आघाडी आणि महायुती दोन्ही बाजुंनी "रेड कार्पेट"

### अजित पवार गटात असताना शरद पवार गटाच्या बॅनरवर 'झळकले'

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील 'अनभिषिक्त सम्राट' असलेले माजी आमदार विलास लांडे यांचा दबदबा पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये सलग दोनला आमदार राहिलेले लांडे यांना बदललेल्या राजकीय समीकरणामध्ये महायुती आणि महाविकास आघाडी अशा दोन्ही बाजुंना 'रेड कार्पेट' आहे.**




जुलै- २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत फूट पडली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपा महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. गेल्या वर्षभरात कधी अजित पवार, तर कधी शरद पवार यांच्या व्यासपीठावर पहायला मिळणारे माजी आमदार विलास लांडे यांनी 'पॉलिटिकल बॅलन्स' साधाला होता.

दरम्यान, माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांनी शहराध्यक्षपदाचा राजीनामा देत शरद पवारांची भेट घेतली. त्यावेळी आता लांडेसुद्धा अजित पवारांची साथ सोडणार, अशी चर्चा होती. परंतु, पक्षप्रवेश केवळ अजित गव्हाणे आणि समर्थकांचा झाला. लांडे यांनी अजित पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला किंबहुना पुण्यातील सर्किट हाऊसमध्ये झालेल्या बैठकीत लक्षवेधी भाषणही केले होते.

### शिव स्वराज्य यात्रेचा पहिला 'शो' लांडेवाडीत...

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला लोकसभा निवडणुकीत शानदार यश मिळाले. पक्षाने निवडणूक लढवलेल्या १० पैकी ८ जागांवर विजय मिळवला. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत या विजयाची पुनरावृत्ती करण्याचा संकल्प आकुर्डी येथे झालेल्या 'विजयी संकल्प' सभेत करण्यात आला. त्यानंतर लगेचच आता पक्षाकडून 'शिव स्वराज्य यात्रा' किल्ले शिवनेरीवरुन सुरू होत आहे. या यात्रेची धुरा शिरुरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या खाद्यावर आहे. या यात्रेचा पहिला 'शो' भोसरीमध्ये अर्थात लांडेवाडी येथे होत आहे.




### लांडे नव्हे, त्यांच्याकडील एकगट्टा मते महत्त्वाची...

भोसरी विधानसभा मतदार संघातील इच्छुक माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांनी शिव स्वराज्य यात्रेच्या निमित्ताने जोरदार 'ब्रँडिंग' केले आहे. या फ्लेक्सवर माजी आमदार विलास लांडे यांचा फोटो झळकतो आहे. अजित पवार गटात असतानाही लांडे महाविकास आघाडीला आपल्या 'प्रोटोकॉल'मध्ये हवे आहेत. यावरुन "अजित गव्हाणे एकट्याने निवडणूक लढवू शकत नाहीत" त्यासाठी लांडे यांची साथ त्यांना महत्त्वाची वाटते, यावर शिक्कामोर्तब होते. किमान एकगट्टा ६० हजार मतांचे धनी असलेले विलास लांडे यामुळेच लांडे महाविकास आघाडी आणि महायुतीसाठी 'संकटमोचक' वाटतात.

# क्रांती दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन...

## भारतमातेचा जयजयकार करत महापालिकेच्या वतीने क्रांती दिन साजरा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**"इन्कलाब जिंदाबाद", "भारत माता की जय", "वंदे मातरम" अशा घोषणांनी भारतमातेचा जयजयकार करत महापालिकेच्या वतीने क्रांती दिन साजरा करण्यात आला. क्रांतीदिनानिमित्त चिंचवड येथील क्रांतीवीर चापेकर बंधूंच्या समूह शिल्पास, चिंचवड स्टेशन येथे क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास तसेच दापोडी येथील शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**



चिंचवड येथील अभिवादन प्रसंगी माजी नगरसदस्य भाऊसाहेब भोईर, गणेश लोंढे, सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे, माजी नगरसदस्या अश्विनी चिंचवडे, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच अंबर चिंचवडे आणि सामाजिक कार्यकर्ते गतीराम भोईर, विजय गावडे, आप्पा भोईर, आबा गावडे, नकुल भोईर, संतोष पाटील आदी उपस्थित होते.

चिंचवड स्टेशन येथील क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास अभिवादन प्रसंगी कार्यकारी अभियंता नितीन देशमुख साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष अण्णा कसबे, उपअभियंता विजय कांबळे आदी उपस्थित होते.

दापोडी येथील शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे यांच्या पुतळ्यास अभिवादन प्रसंगी माजी महापौर कविचंद भाट, माजी नगरसदस्य रोहीत उर्फ आप्पा काटे, माजी नगरसदस्या स्वाती उर्फ माई काटे, शहीद नारायण दाभाडे यांचे नातू धनंजय दाभाडे तसेच त्यांचे नातेवाईक रेखा दाभाडे, पद्मसिंह दाभाडे, सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ जगताप, रविंद्र कांबळे, मयूर जयस्वाल, चंद्रकांत काटे, योगेश बहिरट, माता फेरपाल, मेहबूब शेख, भाऊसाहेब पठारे, मिलींद फडतरे आदी उपस्थित होते.

चिंचवड गावातील दामोदर हरी चापेकर यांनी बाळकृष्ण आणि वासुदेव या बंधूसह पुण्यामध्ये औंध येथील गणेशखिंडीत रॅन्ड या जुलमी इंग्रज अधिकाऱ्याची हत्या केली आणि देशाच्या क्रांतीच्या इतिहासातील क्रांतीची मशाल अधिकच प्रज्वलीत केली. त्यांच्या या कृत्याबद्दल इंग्रजांनी चापेकर बंधूना आणि त्यांचे सहकारी महादेव रानडे यांना फाशीची शिक्षा दिली. त्यांच्या स्मरणार्थ चिंचवड येथे हुतात्मा चापेकर चौकात चापेकर बंधू तसेच त्यांचे सहकारी रानडे यांचे समूह स्मारक बांधण्यात आले आहे. चिंचवड स्टेशन येथे क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि वासुदेव बळवंत फडके यांचा पुतळा आहे. वस्ताद साळवे हे आद्य क्रांतीगुरू दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, निशाणेबाजी यासारख्या युद्धकलेत निपुण होते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यासारख्या

### देशप्रेमींना तसेच तरूणांना प्रेरणा

दापोडी येथे थोर क्रांतिकारक शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे यांचा पुतळा आहे. इन्कलाब जिंदाबाद अशा घोषणा देत शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झाले. तर शहीद नारायण दाभाडे हे विद्यार्थीदशेत असताना स्वातंत्र्यपूर्व काळात पुण्यातील कचेरीवरील युनियन जॅक उतरवून तेथे तिरंगा लावत असताना इंग्रज अधिकाऱ्यांनी केलेल्या गोळीबारात गोळी लागून शहीद झाले. त्यांच्या बलिदानामुळे देशातील स्वातंत्र्यसैनिकांना, देशप्रेमींना तसेच तरूणांना प्रेरणा मिळाली.

# शाळेतील गैरप्रकार: मुलांच्या सुरक्षेचा आणि मानसिक आरोग्याचा गंभीर प्रश्न!



भूमिका

- हर्षल आल्पे
+91 97638 92199

**शाळा ही ज्ञानदानाचे पवित्र स्थान आहे, परंतु सध्याच्या काळात काही शाळांमध्ये घडणारे गैरप्रकार विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याला गंभीरपणे बाधित करत आहेत. ताज्या उदाहरणांमधून समजते की काही शाळा आणि शिक्षकांची वर्तणूक विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची आणि मानसिक आरोग्याची संपूर्णपणे उपेक्षा करीत आहे.**

**धार्मिक आचार आणि त्याचा परिणाम**

तळेगाव दाभाडे येथील एका शाळेत मुलांना देवांच्या तसबिरींसाठी हार-फुले आणि उदबत्त्या आणण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रत्येक लहान मुलाला उदबत्ती लावण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. अशा वर्तनामुळे मुलांच्या जीवाशी खेळ होण्याची शक्यता निर्माण होते. उदबत्ती लावताना लहान मुलांच्या हातावर भाजण्याचा धोका आहे, तसेच धुरामुळे श्वसनाच्या तक्रारी देखील होऊ शकतात. धार्मिक आचारांचे पालन करणे गरजेचे असले तरी ते सुरक्षिततेच्या कक्षेत असावे, असे पालकांचे प्रांजळ मत आहे. अनेक पालकांनी याबाबत तक्रारी करून सुद्धा शाळा प्रशासन याकडे काना डोळा करते. हे अत्यंत चुकीचे आहे. संस्कारांच्या नावाखाली चाललेल्या या थोतांड प्रकाराला शाळा प्रशासनाने आळा घातला पाहिजे.





मुलांच्या खाजगी गोष्टींमध्ये हस्तक्षेप

शाळेतील शिक्षकांनी मुलांच्या घरातील खाजगी गोष्टींबाबत चौकशी करणे हे अत्यंत गैरसोयीचे ठरते. नुकतेच एका शाळेत सहा-सात वर्षांच्या मुलीला तिच्या आईच्या मृत्यूबाबत शिक्षिकेने खोलात जाऊन विचारणा केली. त्या मुलीच्या वडिलांनी दुसरे लग्न केले . आणि त्यानंतर या मुलीच्या आईचा दुर्दैवी अंत झाला, त्याचा दोष वडिलांना दिला गेला, आता ते दोषी आहेत की नाही. याची त्या मुलीला कल्पना असण्याच काही कारण नाही , अन तरीही या घरातल्या खाजगी गोष्टींविषयी विचारणा केल्यामुळे त्या मुलीच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम झाला. अशा संवेदनशील गोष्टींबाबत मुलांना विचारणा करणे हे अत्यंत चुकीचे आणि अमानवीय अन् घृणास्पद आहे. याचा निषेध करावा तेवढा थोडा आहे.

**व्यतिरिक्त खर्चाची मागणी**

काही शाळा विविध कारणांसाठी पालकांकडून दररोज व्यतिरिक्त खर्च मागतात. हा व्यवहार पालकांसाठी मानसिक तणावाचा विषय बनतो. त्यातून उत्पन्न होणाऱ्या आर्थिक ताणामुळे पालकांना खूपच त्रास होतो. जे पालक या गोष्टीला विरोध करतात, त्यांच्याकडे शाळा दुर्लक्ष करते आणि त्यांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान करण्याची धमकी देते.

**पालकांची मागणी!**

शाळेत अशा गैरप्रकारांना त्वरित आळा घालावा आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याचे संरक्षण करावे, अशी पालकांची मागणी आहे. शाळेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची आणि त्यांच्या मानसिक आरोग्याची संपूर्ण काळजी घेतली पाहिजे. धार्मिक आचार व संस्कार हे मुलांच्या घरातील संस्कारानुसार होणे आवश्यक आहे आणि शाळेने त्यात हस्तक्षेप करू नये. तसेच, शाळेने विद्यार्थ्यांकडून अनावश्यक खर्चाची मागणी करू नये आणि पालकांच्या आर्थिक स्थितीचा आदर करावा.

शाळेतील अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पालक आणि शिक्षक संघटनांनी एकत्र येऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याकरिता आणि त्यांच्या मानसिक आरोग्याच्या सुरक्षेसाठी हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. आणि याची गंभीर दखल घेतली गेलीच पाहिजे.

## प्रासंगिक »

# ‘शहाणा’ मोहम्मद!

***नरसिंह राव, देवेगौडा यांनी भारतात अथवा रेगन यांनी अमेरिकेत दाखवून दिले. डॉ. मनमोहन सिंग यांचे काय झाले?***

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी अण्णा हजारे यांस बसवण्याची इच्छा व्यक्त करणे आणि बांगलादेशाची सूत्रे मोहम्मद युनूस यांच्या हाती देणे यामागील विचारांत तत्त्वत: काही फरक नाही. सदिच्छा आणि सक्रिय सद्हेतू मनात असणे वेगळे आणि अशा व्यक्तींमुळे सुप्रशासन निर्माण करण्याचा प्रयत्न करणे निराळे. नोबेल पारितोषिकाविषयी नितांत आदर व्यक्त करून त्यांच्या हाती देशाची सूत्रे देण्याच्या निर्णयाचे संभाव्य दुष्परिणाम नोंदवणे आवश्यक ठरते. युनूस यांच्या हाती सत्तासूत्रे देण्याच्या मागणी आणि नंतरच्या कृतीतून बंग बंधूंची तिसऱ्या जगातील परिचित अशी मानसिकता दिसते. हे याची दखल घेण्यामागील आणखी एक महत्त्वाचे कारण. बांगलादेशीयांस लाख वाटत असेल युनूस यांनी देशाचे सारथ्य करावे! तसे केवळ वाटण्याच्या परिणामांचा धोका मर्यादित होता. परंतु युनूस यांनाही जेव्हा लोकांस वाटते ते करावे असे वाटले.

जागतिक बाजारपेठेत कांद्याची मागणी गेल्या दीड वर्षापासून वाढलेली असताना केंद्र सरकारने निर्यात वाढवण्याऐवजी निर्यात शुल्क वाढवले, या संदर्भातील ताजी आकडेवारी (‘धोरण धरसोड’, ४ ऑगस्ट, दै. लोकसत्ता, दत्ता जाधव) या बातमीतून पुढे आली आहे.

# जागतिक कांदा बाजारपेठ गमावण्याची गॅरंटी

केंद्र सरकारने ऑगस्ट २०२३ मध्ये कांद्याला प्रति क्विंटल ४६,५०० रुपये (५५० डॉलर) निर्यात मूल्य लागू केले. त्यावर ४० टक्के म्हणजे १८,४८० रुपये निर्यात कर आहे. शिवाय निर्यातीसाठी बंदरापर्यंत कांदा पोहोचविण्याचा खर्च प्रति टन सहा हजार रुपये आहे. त्यामुळे नाशिकमधून कांदा बंदरावर जाईपर्यंत तो प्रति क्विंटल सुमारे ७० ते ८० हजार (८०० ते ९०० डॉलर) रुपयांवर जातो. दुसरीकडे, पाकिस्तान, इजिप्त, तुर्की आणि इराणचा कांदा जागतिक बाजारात ४१-४२ हजार रुपये (सुमारे ५०० डॉलर) प्रति टन दराने उपलब्ध आहे. यास्तव भारतीय कांद्याला जागतिक बाजारात मागणी नाही. गतवर्षी देशात ३०० लाख टन कांदा उत्पादन झाले. एकट्या महाराष्ट्रात रब्बी हंगामात ६० लाख टन उत्पादन झाले. देशाची कांद्याची वार्षिक गरज सरासरी १७० लाख टन असते. देशाची सद्या:स्थितीत कांद्याची गरज २०० लाख टन धरली तरी १०० लाख टन कांदा भारतात पडून राहिला, असे प्रथमदर्शनी दिसून येते.आंतरराष्ट्रीय



बाजारपेठेतील कांद्याची वाढती मागणी पाहता हा कांदा निर्यात केला तर आपण इतर देशांना मागे टाकू शकतो. कांद्याचे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील दर पाहता भारतात कांद्याला चार ते पाच हजार रुपये प्रति टन हमीभाव देणेही सरकारला परवडणारे आहे. मात्र ४० टक्के निर्यात शुल्कामुळे कांदा उत्पादक शेतकरी नागवला गेला आहे. स्वतंत्र भारत पक्षाचे अनिल घनवट सांगतात, ‘कांद्याचा प्रति किलो उत्पादन खर्च सरासरी १५ रुपये आहे. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यांत कांद्याची घाऊक विक्री १५ रुपयांच्याच आसपास असते. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. शेतकऱ्यांना कांद्याला प्रति किलो ३० ते ३५ रुपये दर मिळणे आवश्यक आहे, तर ग्राहकांना तो ४० ते ४५ रुपये किलो दराने विकला गेला पाहिजे.’ विंचूरचे कांदा निर्यातदार अतिश बोराटे सांगतात, ‘देशातून निर्यात होणाऱ्या कोणत्या वस्तू अथवा उत्पादनावर ४० टक्के निर्यात कर आहे, हे सरकारने सांगावे. मोठ्या कष्टाने कमावलेली जागतिक कांदा बाजारपेठ भारताच्या हातून गेली आहे.’ लोकसभा २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ‘मोदी की गॅरंटी’ हे भाजपचे घोषवाक्य होते. गेल्या दहा वर्षांतील कृषिमंत्री कोण, हे गूगलवर शोधल्याशिवाय सांगता येणार नाही अशी मोदींच्या मंत्रिमंडळाची आणि कृषिमंत्र्यांची लोकप्रियता. तीन कृषी कायदे आणण्याचे व मागे घेण्याचे श्रेयही मोदींचेच. त्यामुळे कांदा निर्यातीवरील निर्यात (झिझिया) कर म्हणजे मोदींचीच गॅरंटी म्हणावी लागेल. तिच्यामुळेच जागतिक कांदा बाजारपेठ भारताच्या हाताबाहेर चालली आहे. कांद्याच्या लागवडीत जगभरात भारताचा पहिला क्रमांक आहे. भारतात दरवर्षी सरासरी २०० लाख टन कांद्याचे उत्पादन निघते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बीडमध्ये राज ठाकरेंचा ताफा अडवला!

## सुपाऱ्या फेकल्या; उबाठा गटाकडून घोषणाबाजी

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या बीड दौऱ्यावर आहेत. ते आज सायंकाळी बीडमध्ये दाखल झाले. दरम्यान, मनसेचे कार्यकर्ते राज ठाकरे यांचं स्वागत करण्यासाठी थांबले होते. तत्पूर्वी मोठ्या जमावाने राज ठाकरे यांचा ताफा अडवला. राज ठाकरे यांच्याविरोधात घोषणाबाजी देखील केली. या जमावातील काही लोक 'एक मराठा, लाख मराठा' अशा घोषणा देत होते. त्यामुळे हे मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते असावेत, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील कार्यकर्ते असावेत, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र त्यांच्यापैकी अनेकांकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे झेंडे, मशाल चिन्ह असलेले झेंडे दिसत होते. त्यामुळे हे ठाकरे गटाचे कार्यकर्ते असू शकतात.**



दरम्यान, राज ठाकरे यांचे स्वागत ज्या ठिकाणी केलं जाणार होतं त्या ठिकाणी जमावाने सुपाऱ्या फेकल्या, 'सुपारीबाज, सुपारीबाज' अशा घोषणा देखील दिल्या. यावेळी मनसे कार्यकर्ते आणि राज ठाकरेंना विरोध करण्यासाठी जमलेले कार्यकर्ते भिडल्याचं पाहायला मिळालं. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना शांत केलं.दरम्यान, राज ठाकरेंना विरोध करण्यासाठी जमलेले शिवसेनेच्या ठाकरे गटातील काही कार्यकर्ते, बीड जिल्हा शिवसेना अध्यक्ष गणेश वरेकर एबीपी माझाशी बोलत असताना म्हणाले, राज ठाकरे यांनी लोकसभेला सुपारी घेऊन बिनशर्त पाठिंबा दिला (भाजपाला) होता. आता विधानसभेला ते कोणाची सुपारी घेऊन मराठवाड्यात आले आहेत? हे विचारण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत.महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटला आहे. मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मराठा समाज एकवटला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे ओबीसी समुदाय त्यांचं आरक्षण वाचवण्यासाठी आंदोलन करू लागला आहे. दोन समाज संघर्ष करत असताना राज्य सरकारने यावर भूमिका स्पष्ट केलेली नाही. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे मराठा, ओबीसींसह सर्वच समाज राज ठाकरेंवर संतापले आहेत. “महाराष्ट्रात सगळ्या गोष्टी इतक्या मुबलक प्रमाणात आहेत की आरक्षणाची गरजच नाही. आपल्याला केवळ पैशांचं व्यवस्थित नियोजन केलं पाहिजे”, असं वक्तव्य राज ठाकरे यांनी केलं होतं. राज ठाकरे यांच्या या वक्तव्याविरोधात राज्यभरातून निषेध केला जात आहे. तीन दिवसांपूर्वी राज ठाकरे धाराशिव येथे मुक्कामासाठी आले असता, त्यांना भेटून जाब विचारण्यासाठी मराठा तरूण जोरदार घोषणाबाजी करीत हॉटेलमध्ये घुसल्याचं पाहायला मिळालं. त्यापाठोपाठ आज बीडमध्येही राज ठाकरे यांना मराठा कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरं जावं लागलं आहे.दरम्यान, राज ठाकरे यांचे स्वागत ज्या ठिकाणी केलं जाणार होतं त्या ठिकाणी जमावाने सुपाऱ्या फेकल्या, 'सुपारीबाज, सुपारीबाज' अशा घोषणा देखील दिल्या. यावेळी मनसे कार्यकर्ते आणि राज ठाकरेंना विरोध करण्यासाठी जमलेले कार्यकर्ते भिडल्याचं पाहायला मिळालं. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना शांत केलं.दरम्यान, राज ठाकरेंना विरोध करण्यासाठी जमलेले शिवसेनेच्या ठाकरे गटातील काही कार्यकर्ते, बीड जिल्हा शिवसेना अध्यक्ष गणेश वरेकर एबीपी माझाशी बोलत असताना म्हणाले, राज ठाकरे यांनी लोकसभेला सुपारी घेऊन बिनशर्त पाठिंबा दिला (भाजपाला) होता. आता विधानसभेला ते कोणाची सुपारी घेऊन मराठवाड्यात आले आहेत? हे विचारण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत.महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटला आहे. मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मराठा समाज एकवटला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे.

### धाराशिवमध्येही मराठा कार्यकर्त्यांचा विरोध

दोन समाज संघर्ष करत असताना राज्य सरकारने यावर भूमिका स्पष्ट केलेली नाही. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे मराठा, ओबीसींसह सर्वच समाज राज ठाकरेंवर संतापले आहेत. “महाराष्ट्रात सगळ्या गोष्टी इतक्या मुबलक प्रमाणात आहेत की आरक्षणाची गरजच नाही. आपल्याला केवळ पैशांचं व्यवस्थित नियोजन केलं पाहिजे”, असं वक्तव्य राज ठाकरे यांनी केलं होतं. राज ठाकरे यांच्या या वक्तव्याविरोधात राज्यभरातून निषेध केला जात आहे.

# कायद्याच्या चौकटीत टिकणारे आरक्षण देणार

## मराठा समाजाला देवेंद्र फडणवीस यांचे पुन्हा आश्वासन

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मराठा समाजाला कोणत्याही परिस्थितीत आरक्षण मिळाले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. आरक्षण आणि विकासाच्या सर्व प्रश्नांबाबत चर्चेतून मार्ग काढण्यात येत आहेत. काहीही झाले, तरी मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणाऱ्या आरक्षणाबाबत निर्णय घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ आणि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने एक लाख मराठा उद्योजक संकल्पपूर्ती मेळावा झाला. या वेळी आयोजित कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. या वेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक -निंबाळकर, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल पाटील, जिल्हा बँकेचे व्यवस्थापक राजेंद्र सरकाळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी



नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम आदी उपस्थित होते.मराठा समाज शतकानुशतके समाजातील अठरापगड जाती-जमातींना सोबत घेऊन चाललेला आहे. या समाजाचे आर्थिक, सामाजिक उन्नतीचे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आरक्षणाच्या बाबतीत कायद्याच्या चौकटीत टिकणारे निर्णय घेण्यात येणार आहेत. मराठा समाजातील तरुणांनी नोकरी देणारे व्हावे, असेही या वेळी फडणवीस म्हणाले.या वेळी त्यांनी मराठा उद्योजक निर्मितीचा एक लाखाचा यशस्वी टप्पा पूर्ण केल्याबद्दल महामंडळाचे विशेष अभिनंदनही केले. एक लाख मराठा उद्योजक निर्माण करण्याचे काम महामंडळाने केले आहे. ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### तरुणांसाठी वसतिगृह उभे करू

बँकांच्या माध्यमातून साडेआठ हजार कोटींचा कर्जपुरवठा करण्यात आला आहे. जवळपास ८२५ कोटी व्याज परतावा महामंडळाने दिला आहे. सारथी'सारख्या संस्थांच्या निर्मितीने गरीब शेतकऱ्यांच्या, मराठा समाजातील सर्वसामान्यांच्या तरुणांना स्पर्धा परीक्षांचे दालन उपलब्ध करून दिले आहे. समाज, समाजातील तरुण यांच्या विकासासाठी कार्ययोजना करणे आवश्यक असते; ते 'सारथी'ने करून दाखविले आहे. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मागणी केल्याप्रमाणे सातारा येथे मराठा समाजातील तरुणांसाठी वसतिगृह उभे करून दिले जाईल.

# महाविद्यालयाच्या हिजाब बंदीला स्थगिती!

## ‘टिळा, टिकलीला परवानगी का?’, सर्वोच्च न्यायालयाचा प्रश्न

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबईतील चेंबूर येथील ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या एन. जी. आचार्य आणि डी. के. मराठे महाविद्यालयाने हिजाब, नकाब, बुरखा, स्टोल, टोपी आणि इतर सर्व प्रकारच्या धार्मिक पेहरावांवर बंदी घातली होती. या निर्णयाला नऊ विद्यार्थिनींनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. महाविद्यालयाने धार्मिक पेहरावांवर घातलेली बंदी योग्यच असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने २७ जून) दिला होता. त्यानंतर या मुलींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयात आज या प्रकरणाची सुनावणी झाली असता महाविद्यालयाने पेहरावांवर घातलेली बंदी अयोग्य असल्याचे सांगून या निर्णयाला स्थगिती दिली. मात्र त्याचवेळी वर्गात मुलींना बुरखा घालण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. मात्र महाविद्यालयाच्या संकुलात कोणत्याच धार्मिक कृत्यांना परवानगी देऊ नये, असेही सांगितले.**



न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायाधीश संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली असताना न्यायालयाने महाविद्यालयाच्या धोरणावर टीका केली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने महाविद्यालयाच्या वकिलांना काही परखड प्रश्न विचारत टिळा आणि टिकलीबाबत काय निर्णय घेणार? असे विचारले. पेहरावाबाबत नियम केले तर तुम्ही इतर धर्मांच्या बाबतीतही हाच निर्णय घेणार का? असेही न्यायालयाने विचारले. सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठाने सांगितले की, विद्यार्थीनींना कोणताही पेहराव करण्याचे स्वातंत्र्य आहे आणि महाविद्यालय त्याबाबत बळजबरी करू शकत नाही. आम्हाला आश्चर्य वाटते की, महाविद्यालयाला अनेक धर्म असल्याचा साक्षात्कार आता कसा काय झाला? तुम्ही कुणाला टिळा लावू नका म्हणून सांगू शकता का? पेहरावाच्या नियमांमध्ये याचा समावेशच नाही, असा प्रश्न न्यायाधीश संजय कुमार यांनी महाविद्यालयाच्या वकिलांना विचारला असल्याचे वृत्त लाईव्ह लॉने दिले आहे.न्यायाधीश खन्ना यांनीही महाविद्यालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, “हे काय आहे? धर्म कळेल असा पेहराव घालू नका. काय नावावरून धर्माची ओळख होत नाही का? मग तुम्ही काय आता विद्यार्थ्यांना नंबर देऊन पुकारणार आहात का? विद्यार्थ्यांना एकत्र अभ्यास करू द्या.” ज्येष्ठ वकील माधवी दिवाण यांनी महाविद्यालयाची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडली. न्यायाधीश कुमार यांनी विचारले की, हे महाविद्यालय कधी स्थापन झाले. यावर दिवाण यांनी उत्तर देताना सांगितले की, २००८ साली स्थापना झाली. “मग इतके वर्ष तुम्ही पेहरावाबाबत काहीच नियम केले नाहीत आणि आताच तुम्हाला धर्म आहेत, याचा साक्षात्कार कसा काय झाला? हे खूप दुर्दैवी आहे की, इतक्या वर्षांनंतर महाविद्यालयाने अशाप्रकारचे नियम करावेत”, असे न्यायाधीश कुमार म्हणाले. चेंबूरमधील एन.जी. महाविद्यालयाने गेल्या मे महिन्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी नवा गणवेश लागू केला होता. जून महिन्यामध्ये नव्या शैक्षणिक वर्षापासून तो सर्व विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा केला. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यामध्ये मुलींनी हिजाब घालून महाविद्यालयात येण्यावरून वाद झाला होता. कनिष्ठ महाविद्यालयातील हिजाब घालणाऱ्या अनेक मुली महाविद्यालयातील गणवेशाच्या नियमाचे पालन करीत नसल्यावरून हा वाद उद्भवला होता. त्यानंतर महाविद्यालयाने गणवेशासंदर्भात नवे कठोर नियम लागू करण्याचा निर्णय घेतला. या नव्या गणवेश धोरणानुसार महाविद्यालयाच्या आवारामध्ये गणवेशाव्यतिरिक्त बुरखा, नकाब, हिजाब, टोपी, स्टोल, बॅज वा तत्सम कोणतीही गोष्ट परिधान करण्यावर बंदी घालण्यात आली.महाविद्यालयाचे हे गणवेश धोरण अन्यायकारी आणि अनावश्यक असल्याचा दावा करीत त्याविरोधात नऊ मुलींनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. त्यांनी अशा प्रकारची बंदी लादण्याचा कोणताही अधिकार महाविद्यालय प्रशासनाला नसल्याचा दावा केला. कुराण आणि हदीसनुसार, नकाब व हिजाब ही अत्यंत आवश्यक धार्मिक प्रथा असून, ती आमच्या धार्मिक श्रद्धेचा अविभाज्य भाग असल्याचेही त्यांनी याचिकेद्वारे न्यायालयासमोर मांडले.

### प्रकरण कधी सुरू झाले?

न्यायालयाने महाविद्यालाच्या निर्णयाचे समर्थन करीत म्हटले, “व्यापक शैक्षणिक हिताचा विचार करून महाविद्यालयाने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यघटनेतील कलम १९ (१) (अ) आणि कलम २५ चे उल्लंघन होत नाही. विद्यार्थ्यांच्या पेहरावांमधून त्यांचा धर्म उघड होऊ नये, हाच यामागचा उद्देश आहे. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि ज्ञान घेण्यावर अधिक भर द्यावा, या व्यापक शैक्षणिक हिताच्या उद्देशानेच महाविद्यालयाने हा निर्णय घेतला आहे”, असेही उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले होते.मुंबईतील चेंबूर येथील ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या एन. जी. आचार्य आणि डी. के. मराठे महाविद्यालयाने हिजाब, नकाब, बुरखा, स्टोल, टोपी आणि इतर सर्व प्रकारच्या धार्मिक पेहरावांवर बंदी घातली होती

---

# मनीष सिसोदियांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

## दिल्लीतील मद्यधोरण घोटाळ्याप्रकरणी जामीन मंजूर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील मद्य घोटाळ्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मनीष सिसोदिया यांना दीर्घकाळ तुरुंगात ठेवणं योग्य नाही, नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद आहे, अशी टीप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने केली आहे.**



मनीष सिसोदियांच्या यांच्या जामीन अर्जावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने त्यांना १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.“मनीष सिसोदिया हे दीर्घकाळापासून तुरुंगात आहे. अशा प्रकारे त्यांना तुरुंगात ठेवणं योग्य नाही. जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद आहे, हे सत्र व उच्च न्यायालयाने समजून घेणं गरजेचं आहे”, अशी टीप्पणी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केली. दरम्यान, यावेळी ईडीच्या वकिलांनी सिसोदिया यांना जामिनासाठी सत्र न्यायालयात अर्ज करायला सांगावा, अशी मागणी केली होती. ही मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. “सिसोदिया यांना जामिनासाठी ट्रायल कोर्टात पाठवणं हा न्यायाचा अपमान केल्यासारखा होईल, त्यामुळं आम्ही त्यांना जामीन देत आहोत”, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर मनीष सिसोदिया यांच्या वकिलांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रतिक्रिया दिली. “सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय ऐतिहासिक आहे. १७ महिन्यांतर त्यांना जामीन मिळाला आहे.

### नेमकं प्रकरण काय?

संबंधित मनी लॉंडरिंग प्रकरणी गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात अटक करण्यात आली होती. तेव्हापासून ते तुरुंगात होते. मात्र, न्यायालयाने त्यांना आता १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे त्यांचा तुरुंगातून बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.गेल्यावर्षी १७ नोव्हेंबरला दिल्ली सरकारने नवीन उत्पादन शुल्क धोरण लागू केले होते. या धोरणामुळे कोट्यवधी रुपयांची उलाढाल होईल आणि मद्य माफियांवर अंकुश बसेल, असा विश्वास दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांनी व्यक्त केला होता.

# सांस्कृतिक विभाग लेखकांना कलाकार मानत नाही

मराठी नाटक, टीव्ही मालिका लिहिणारा एक मराठी लेखक सांस्कृतिक कार्य विभागाकडे कलाकार असल्याचे प्रमाणपत्र मागायला गेला. पण 'सांस्कृतिक विभाग लेखकांना कलाकार मानत नाही. त्यामुळे त्यांना कलाकार प्रमाणपत्र आम्ही देऊ शकत नाही,' असं अधिकाऱ्याने त्या लेखकाला म्हटलं. लेखकाला म्हाडा प्राधिकरणाच्या कलाकार कोट्यातून लॉटरीमध्ये घर लागलं आहे. पण ज्या लेखकांना या अगोदर घरं मिळाली आहेत, त्यांच्याकडून ती परत घेण्यासाठी आम्ही म्हाडाला पत्र लिहू, असंही त्या अधिकाऱ्याने म्हटलं. यानंतर सोशल मीडियावर मराठी कलाकार नाराजी व्यक्त करत आहेत.'सत्यप्रेम की कथा' चित्रपटाचे मराठमोळे दिग्दर्शक समीर विद्वांस यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'मधील बातमी शेअर करत पोस्ट केली आहे. समीर यांनी लिहिलं, "बरोबरच आहे! लेखक कलाकार नाहीतच! सगळे दिग्दर्शक, अभिनेते स्वयंभू आहेत! स्टेजवर, स्क्रीनवर येऊन ते बाराखडी आणि पाढेच म्हणतात. लेखन ही कला थोडीच आहे? किराणा मालाची यादी आणि संहिता यात काहीच फरक नाही. अच्छा ते स्टेजवर भाषणं देणाऱ्या नेत्यांना अधिकृत कलाकार मानायचं का आता." समीर विद्वांस यांची ही उपरोधिक पोस्ट चांगलीच चर्चेत आहे.याचबरोबर मराठी अभिनेता शशांक केतकर यानेही पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. "सरकारी जाहिराती लिहायला लेखक लागतात ना?" असा प्रश्न विचारत शशांक केतकरने नाराजी व्यक्त केली आहे.सोशल मीडियावर कलाकार याविरोधात पोस्ट करत आहेत. लेखकांचं कला क्षेत्रात महत्त्वाचं स्थान आहे.

# 'नवरा माझा नवसाचा 2' चित्रपटाचा पहिला पोस्टर प्रदर्शित

बहुचर्चित 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून मराठी रसिक प्रेक्षकांचं लक्ष याकडेचं लागून राहिलं आहे. काही दिवसांपूर्वी 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपटाचा पहिला पोस्टर प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता सचिन पिळगांवकर यांनी चित्रपटातील पहिलं गाणं कधी प्रदर्शित होणार? हे जाहीर केलं आहे.महिन्यापूर्वी सचिन पिळगांवकर यांनी स्वतः 'नवरा माझा नवसाचा २' ( NAVRA MAZA NAVSACHA 2 ) चित्रपटातील एका गाण्याची हिंट दिली होती. 'रेडिओ सिटी मराठी'ला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले होते की, ""नवरा माझा नवसाचा २' चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण झालं आहे. डबिंग पूर्ण झालं आहे. पोस्ट सध्या चालू आहे. त्याची धावपळ सुरू आहे. चित्रपटाचं चित्रीकरण करताना कलाकार म्हणून स्वप्नील जोशीने; जो मला माझ्या मुलासारखा आहे. त्याने या चित्रपटात जे काही काम केलं आहे, तर मला नाही वाटतं त्याने याआधी इतकं सुंदर काम कुठल्या दुसऱ्या चित्रपटात केलं असावं. चित्रपटात एक गाणं आहे; त्याची घोषणा मी वेगळ्या पद्धतीने गाण्यासकट करणारच आहे. पण त्या गाण्याबद्दल मात्र नक्कीच बोलायचं आहे. ते जे गाणं आहे ते चित्रपटाच्या शेवटी येत आणि ते गाणं मी व आदर्श शिंदेंनं गायलं आहे."'नवरा माझा नवसाचा २' ) चित्रपटातील याचं गाण्याचं पहिलं पोस्टर सचिन पिळगांवकरांनी नुकतंच सोशल मीडियावर शेअर केलं आहे. 'डम डम डम डम डमरू वाजे' असं गाण्याचं नाव आहे. मराठी संगीत क्षेत्रातील लोकप्रिय गायक आदर्श शिंदेसह सचिन पिळगांवकरांनी हे गाणं गायलं आहे. तसंच रविराज कोलथरकर यांनी संगीतबद्ध केलं असून प्रविण दवणे गीतकार आहे. उद्या, ९ ऑगस्टला 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपटातील 'डम डम डम डम डमरु वाजे' हे पहिलं-वहिलं गाणं प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.बहुचर्चित 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून मराठी रसिक प्रेक्षकांचं लक्ष याकडेचं लागून राहिलं आहे.

# मराठी दिग्दर्शकाची फोगटसाठी पोस्ट



भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये दमदार कामगिरी करत पदकाच्या आशा उंचावल्या आहेत. तिने आज झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत युक्रेनची ओक्साना लिवाच हिचा पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली. विनेशच्या या कामगिरीसाठी तिचं कौतुक होत आहे. मराठी अभिनेता व दिग्दर्शक हेमंत ढोमेने विनेशसाठी केलेल्या पोस्टने लक्ष वेधून घेतले आहे.हेमंतने विनेशचे दोन फोटो शेअर करत त्याबरोबर कॅप्शन लिहिलं आहे. विनेश फोगटसह काही कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष बृजभूषण सिंह यांनी महिला खेळाडूंचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर त्यांनी आंदोलन केलं होतं, त्या आंदोलनातील एक फोटो हेमंतने शेअर केला आहे, तर तिचा दुसरा फोटो हा कुस्तीच्या मैदानातील आहे."सत्याचा आणि निश्चयाचा कायम विजय होतो! खूप खूप शुभेच्छा विनेश..या देशाला, आम्हा सगळ्यांना आपला अभिमान आहे. आता गोल्ड मेडलच पाहिजे," असं हेमंतने विनेशचे फोटो शेअर करत लिहिलं आहे.कुस्तीपटू विनेश फोगटने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये चांगली कामगिरी केली आहे. आता ती आपल्या ऐतिहासिक पदकापासून फक्त एक पाऊल दूर आहे. विनेशने कुस्तीच्या राऊंड ऑफ १६ च्या सामान्यात जपानची टोकियो ऑलिम्पिक चॅम्पियन कुस्तीपटू युई सुसाकी हिला ३-२ च्या फरकाने पराभूत केलं. या सामन्यात, विनेश पहिल्या फेरीत ०-१ ने पिछाडीवर होती

# डिक्रुझला तमिळतून केलं बॅन?



दक्षिणात्य आणि बॉलिवूडमधील एक लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे इलियाना डिक्रुझ. ती तिच्या ग्लॅमरस अंदाजामुळे नेहमीच सर्वांचं लक्ष वेधून घेत असते. पण आता ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. इलियानाला तमिळ सिनेसृष्टीतून बॅन केलंय अशा सर्वत्र चर्चा रंगल्या होत्या. ही बातमी ऐकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. आता याबाबतचं सत्य समोर आलं आहे. इलियाना डिक्रूझने एका तमिळ चित्रपटासाठी ॲडव्हान्स रक्कम घेतली होती. परंतु तिने पैसे घेऊनही त्या चित्रपटाचं शूटिंग केलं नाही. यामुळे त्या चित्रपट निर्मात्याचं मोठं नुकसान झालं. नंतर त्या प्रोड्युसरने निर्माता परिषदेकडे तक्रार केली. मिळालेल्या तक्रारीनुसार तामिळ चित्रपट निर्मात्यांनी इलियानाला कोणत्याही चित्रपटासाठी साईन न करण्याचा निर्णय घेऊन तिला बॅन केलं असं बोललं जाऊ लागलं होतं. पण यात किती टक्के आहे याचा खुलासा आता झाला आहे. इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, या संपूर्ण प्रकरणामागचं सत्य जाणून घेण्यासाठी तमिळ फिल्म प्रोड्यूसर्स काऊन्सीलशी चर्चा करण्यात आली. तेव्हा हा अहवाल पूर्णपणे चुकीचा असल्याचं त्यांनी सांगितलं. TFPC कडून अशी कोणतीही बंदी इलियानावर घालण्यात आलेली नाही, असं TFPCचं म्हणणं आहे. त्यामुळे या चर्चांमध्ये कोणतंही तथ्य नसून या सर्व अफवा असल्याचं स्पष्ट झालं आहे.इलियानाने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं तेव्हा ती दक्षिणात्य चित्रपट सृष्टीमधील लोकप्रिय अभिनेत्री होती. तर टॉलिवूडप्रमाणेच बॉलिवूडमध्येही तिने आपली ओळख निर्माण केली. आज तिचा चाहता वर्ग खूप मोठा आहे. पण गेली तीन-चार वर्षे ती दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये दिसली नाही. 2018 मध्ये रवी तेजाच्या 'अमर अकबर अँथनी'मध्ये दिसली होती.

# औरों में कहाँ दम था' बॉक्स ऑफिसवर ठरला फ्लॉप

बॉलीवूड अजय देवगण व अभिनेत्री तब्बू यांचा 'औरों में कहाँ दम था' हा चित्रपट प्रदर्शित होऊन एक आठवडा झाला आहे. शुक्रवारी (२ ऑगस्ट) हा सिनेमा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. पहिल्याच दिवशी चित्रपटाने निराशाजनक कामगिरी केली होती, त्यानंतर एका आठवड्यात या चित्रपटाच्या कमाईत फारशी वाढ झालेली नाही. एका आठवड्यात या चित्रपटाने किती कमाई केली ते जाणून घेऊयात.अजय देवगण व तब्बू यांचा हा एकत्र १० वा चित्रपट आहे. 'भोला', 'दृश्यम २' यासारख्या दमदार चित्रपटांनंतर पुन्हा एकदा अजय व तब्बूची जोडी 'औरों में कहाँ दम था' सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आली. रोमँटिक चित्रपट 'औरों में कहाँ दम था' पहिल्या दिवशी







भारतातील बॉक्स ऑफिसवर फक्त १.८५ कोटी रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी २.१५ कोटी, तिसऱ्या दिवशी २.७५ कोटी, चौथ्या दिवशी एक कोटी, पाचव्या दिवशी ९५ लाख, सहाव्या दिवशी ७५ लाख व सातव्या दिवशी ६४ लाख रुपये कमावले.या चित्रपटाची एका आठवड्यातील भारतातील एकूण कमाई १०.९ कोटी रुपये झाली आहे. या चित्रपटाने भारताबाहेर १.७५ कोटी रुपये कमावले. या चित्रपटाचे एकूण कलेक्शन १२.८५ कोटी रुपये झाले आहे. 'औरों में कहाँ दम था' चित्रपटाचे बजेट तब्बल १०० कोटी रुपये असल्याचं म्हटलं जात आहे. त्या तुलनेने चित्रपटाने केलेली कमाई खूपच कमी आहे. एका आठवड्याची आकडेवारी पाहता हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला आहे. आकडेवारीनुसार, या चित्रपटाने जगभरात फक्त १२ कोटींची कमाई केली आहे.

# अर्शद नदीमला ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक!

## 92.97 मी. लांब भाला फेकत नवा ऑलिम्पिक विक्रम केला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधील भालाफेक या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पाकिस्तानचा अर्शद नदीम याने नवा विक्रम रचला आहे. अर्शद हा पाकिस्तानचा उत्कृष्ट भालाफेकपटू आहे. अर्शदने या अंतिम फेरीतील दुसऱ्या प्रयत्नात तब्बल ९२.९७ मी. लांब भाला फेकत नवा ऑलिम्पिक विक्रम केला आहे. याआधी ९० मी. लांब भाला फेकण्याचा विक्रम होता. पण अर्शदने हा विक्रम मोडला. आता तो अंतिम फेरीत पहिल्या स्थानी आहे. तर नीरज ८९.४५ मीटर फेक करून दुसऱ्या स्थानी आहे.**




भालाफेकमध्ये पाकिस्तानचा अर्शद नदीमही नीरज ते इतर खेळाडूंसाठी मोठे आव्हान ठरतो. नदीमने टोकियो ऑलिम्पिकमध्येही भाग घेतला होता. परंतु तो पदक जिंकू शकला नाही. मात्र जागतिक स्पर्धेत त्याने रौप्यपदक पटकावले. याशिवाय २०२२ च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये त्याने सुवर्णपदक जिंकले आहे. त्याच्या कामगिरीने आश्चर्यचकित करण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. याशिवाय नदीमने यापूर्वी ९० मीटरपर्यंत भालाफेक केली आहे, जी नीरज चोप्राने अद्याप केलेली नाही. नदीमचा सर्वोत्तम थ्रो ९०.१८ होता. आता त्याने स्वतचा विक्रम मोडत ९२.९७ मी. भालाफेक करत नवा विक्रम केला आहे.पॅरिस ऑलिम्पिकच्या पात्रता फेरीत ८६.५९ मीटरसह अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या अर्शद नदीमची सुरुवात चांगली झाली नाही आणि त्याचा पहिला थ्रो फाऊल झाला. पण दुसऱ्याच थ्रोमध्ये अर्शदने सगळ्यांच्या शंका दूर केल्या इतकंच नाही तर सगळ्यांना चकित केलं. याआधी कारकिर्दीत त्याने एकदाच ९० मीटर थ्रो केला होता, मात्र यावेळी त्याने ९३ मीटरच्या जवळ फेक करून सर्व विक्रम मोडीत काढले. अर्शद नदीमचे ऑलिम्पिक पदक जवळपास निश्चित झाले आहे. जर त्याने पदक जिंकले तर तो ३२ वर्षांनंतर पाकिस्तानसाठी पदक आणेल. पाकिस्तानने १९९२ मध्ये ऑलिम्पिकमध्ये शेवटचे पदक जिंकले होते. जे हॉकी संघाने पटकावले होते. आतापर्यंत पाकिस्तानकडे ८ ऑलिम्पिक पदके आहेत. याआधी मोहम्मद बशीरने १९६० मध्ये रोममध्ये कुस्तीमध्ये आणि १९८८ मध्ये सोलमध्ये हुसैन शाहने बॉक्सिंगमध्ये कांस्यपदक जिंकले होते.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये पदकांच्या तालिकेत अमेरिका, चीन, फ्रान्स या देशांमध्ये पदक तालिकेत मोठी चढाओढ सुरू आहे. अमेरिकेने १०० पदकांचा टप्पाही गाठला आहे. तर पाकिस्तानने एका सुवर्णपदकासह आपले खाते उघडले. गुरुवारी (८ ऑगस्ट) भालाफेक स्पर्धेत भारताला नीरज चोप्राकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती, पण अर्शद नदीमने ९२.९७ मीटरची थ्रो केली. यासह नीरज आणि भारताला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. पाकिस्तानला केवळ १ पदक मिळाले आहे. तर भारताने ५ पदके जिंकली आहेत. नेमबाजीत ३ पदकं हॉकी आणि भालाफेकीत पदके मिळवली. पदकांची संख्या जास्त असूनही भारत मागे आहे. पाकिस्तान त्यापेक्षा ११ स्थानांनी वर झेप घेतली आहे. यावरून आता ऑलिम्पिकमध्ये देशांची क्रमवारी कशी ठरवली जाते ते जाणून घेऊया.ऑलिम्पिक खेळांमधील पदकांनुसार देशांची क्रमवारी सुवर्णपदकांच्या आधारे निश्चित केली जाते. देशाने कितीही पदके जिंकली तरी सर्वाधिक सुवर्णपदके जिंकणारा देश अव्वल स्थानावर राहतो. यामुळेच एक सुवर्ण जिंकूनही पाकिस्तान भारतापेक्षा पुढे आहे.

### अर्शद नदीम याने नवा विक्रम रचला

शुक्रवारी (९ ऑगस्ट) दुपारी १.३० वाजेपर्यंत पाकिस्तान ५३व्या तर भारत ६४व्या क्रमांकावर होता. अमेरिका अव्वल स्थानी आहे. तर अमेरिका आणि चीनमध्ये फक्त १ सुवर्णपदकाचा फरक आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत ५ पदकं जिंकली आहेत. नेमबाजीत ३ कांस्यपदके जिंकली आहेत. मनू भाकेरने १० मीटर एअर पिस्तुलमध्ये कांस्यपदक जिंकून खाते उघडले. त्यानंतर सरबज्योत सिंगसह मिश्र सांघिक स्पर्धेत मनूने कांस्यपदक जिंकले. यानंतर स्वप्नील कुसाळेने पुरुषांच्या ५० मीटर थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक पटकावले. याशिवाय भारताने स्पेनचा पराभव करत हॉकीमध्ये कांस्यपदक पटकावले. त्यानंतर नीरजने भालाफेकीत रौप्यपदक जिंकले.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधील भालाफेक या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पाकिस्तानचा अर्शद नदीम याने नवा विक्रम रचला आहे. अर्शद हा पाकिस्तानचा उत्कृष्ट भालाफेकपटू आहे.

# सेहरावतने जिंकलं कुस्तीतील पहिलं पदक

## अमन सेहरावतने कुस्तीमध्ये भारतासाठी कांस्य पदक जिंकले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या २१ वर्षीय अमन सेहरावतने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये ५७ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले आहे. अमनने चुरशीच्या लढतीत पोर्तो रिकोच्या कुस्तीपटूचा १३-५ असा पराभव करून कांस्यपदक जिंकले. अशाप्रकारे पॅरिस ऑलिम्पिकच्या १४ व्या दिवशी भारताने सहावे पदक जिंकले आहे. भारताच्या अमन सेहरावतने पहिल्या फेरीत वर्चस्व राखले आणि प्रतिस्पर्ध्यावर ६-३ अशी आघाडी घेतली. यानंतर अमनने दुसऱ्या फेरीतही आपली आघाडी कायम राखली.**




अमन आशियाई चॅम्पियन राहिला असून २३ वर्षांखालील जागतिक स्पर्धेतही त्याने सुवर्णपदक पटकावले आहे. भारताला कुस्तीत पदकाची अपेक्षा होती, ती अमनने पूर्ण केली आहे. याआधी सर्वांना विनेश फोगटकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती मात्र अतिरिक्त वजनामुळे तिला साम्यापूर्वीच अपात्र ठरवण्यात आले. अशा परिस्थितीत अमनचे हे पदक कुस्तीत भारतासाठी दिलासादायक बाब ठरले आहे. सामन्याच्या शेवटच्या दोन मिनिटांत अमनने पोर्तो रिकोच्या कुस्तीपटूवर ८-५ अशी आघाडी घेतली. यादरम्यान क्रुझ डॅरिएन तोई पूर्णपणे दमलेला दिसला. परिस्थिती अशी बनली की त्याला ब्रेक घ्यावा लागला. शेवटची एक मिनिट बाकी असताना अमनने १२-५ अशी आघाडी मिळवली होती. वेळ संपताच अमनने १३ गुणांसह सामना जिंकला. अशा प्रकारे भारताला १४व्या दिवशी सहावे पदक मिळाले आहे.अमन सेहरावतच्या पदकाने ऑलिम्पिकमध्ये भारताच्या कुस्तीची शान कायम ठेवली आहे. २००८ पासून भारताने सलग ५ ऑलिम्पिकमध्ये कुस्तीमध्ये पदके जिंकली आहेत.

### भारताच्या कुस्तीची शान कायम

हॉकीनंतर भारताची सर्वाधिक ८ ऑलिम्पिक पदकं कुस्तीतून आली आहेत. ऑलिम्पिकच्या इतिहासात प्रथमच, १९५२ मध्ये, केडी जाधवने भारतासाठी कुस्तीमध्ये कांस्यपदक जिंकले. यानंतर ५६ वर्षे भारताला कुस्तीमध्ये पदक मिळाले नाही आणि त्यानंतर सुशील कुमारने २००८ बीजिंग ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून हा दुष्काळ संपवला. तेव्हापासून भारतीय कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये सातत्याने पदके जिंकत आहेत.रवी कुमार दहियाने ५७ किलो वजनी गटात गेल्या ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी रौप्य पदक जिंकले होते. अमनने राष्ट्रीय निवड चाचणीत रवीचा पराभव करून ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली होती. तत्पूर्वी, अमन सेहरावतने उपांत्यपूर्व फेरीत अल्बेनियाच्या झेलीमखान अबाकारोववर तांत्रिक श्रेष्ठतेच्या (१२-०) जोरावर उपांत्य फेरी गाठून पदकाची आशा दिली होती.भारताच्या २१ वर्षीय अमन सेहरावतने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये ५७ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले आहे.